RNI No. MAHBIL 2012/47976
www.dgps.maharashtra.gov.in

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग एक–पुणे विभागीय पुरवणी

वर्ष - १०, अंक - २ ] गुरुवार, जानेवारी २१, २०२१ / माघ १, शके १९४२ [ पृष्ठे २

## असाधारण क्रमांक २

## प्राधिकृत प्रकाशन

### विभागीय आयुक्त यांजकडून

*शुद्धीपत्रक*

क्र. भूसं/आरआर-/कावि/२०७/*शुद्धीपत्रक*/२०२१.--(दिनांक ६ नोव्हेंबर २००६ ची मूळ अधिसूचना व त्यास दिनांक १५ डिसेंबर २०१४ चे शुद्धीपत्रक यास दुरुस्ती ) बाह्यवळण महामार्ग ते वाहतूक नगरीकडे जाणारा ४५ मी. रस्ता रुंदीकरण या सार्वजनिक प्रयोजनासाठी मौजे किवळे व मौजे रावेत, तालुका हवेली, जिल्हा पुणे येथील जमिनी संपादनाबाबत मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांनी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६ *(४)* सह भूमि संपादन अधिनियम,१८९४ च्या कलम ६ अन्वयेची अधिसूचना क्रमांक भू.सं./आरआर-३/एस आर-४८/२००६, दिनांक ६ नोव्हेंबर २००६ अन्वये निर्गत केली असून, महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग-१, पुणे विभागीय पुरवणीमध्ये दिनांक १६ नोव्हेंबर २००६ रोजी पृष्ठ क्र. ७५५० व ७५५१ वर प्रसिद्ध झालेली आहे व दिनांक १५ डिसेंबर २०१४ रोजीची दुरुस्त अधिसूचना क्रमांक भूसं/आरआर-३/एसआर क्र- ४/२०१४, दुरुस्ती अन्वये निर्गत केली असून, महाराष्ट्र शासन राजपत्रात भाग-१, पुणे विभागीय पुरवणीमध्ये दिनांक २५ ते ३१ डिसेंबर २०१४ रोजी पृष्ठ क्र. ११ व १२ वर प्रसिद्ध झाली आहे.

तथापि,ज्याअर्थी, उपअधीक्षक, भूमि अभिलेख, हवेली यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक भूमापन/एलआर-एसआर-४७४/हवेली/१६, दिनांक १२ मे २०१६ अन्वये मौजे किवळे गावचे गाव नकाशाचे अवलोकन करता स.नं. ६६ व ६७ समोरचा पाणंद (रस्ता) संयुक्त मोजणी भूसंपादन नकाशामध्ये दर्शविलेला नाही. त्यामुळे भूसंपादन मोजणी नकाशा गाव नकाशाशी पडताळणी करता तफावत दिसून येते, असे कळविले आहे. तद्नंतर उपअधीक्षक, भूमि अभिलेख यांनी काही तक्रार अर्जांच्या अनुषंगाने पडताळणी करून व मौजे किवळे गावाच्या हद्दीवरील पाणंद/साखळी रस्ता दर्शवून त्यांचेकडील दुरुस्त संयुक्त मोजणी नकाशे व क्षेत्र पत्रके, पत्र क्रमांक भूसंपादन/रावेत-किवळे/हवेली/२०१८, दिनांक १० सप्टेंबर २०१८ अन्वये (संयुक्त मोजणी नकाशे क्र. १ ते ३ मो.रं.नं.४५/२००६) व पत्र क्रमांक भूसंपादन/रावेत-किवळे/हवेली/२०१८, दिनांक २२ नोव्हेंबर २०१९ (संयुक्त मोजणी नकाशा क्र. ४ मो.रं.नं.४५/२००६) अन्वये सादर केले. सदर सादर संयुक्त मोजणी नकाशे हे मंजूर विकास योजना प्रस्तावाची सुसंगत असल्याचे उपसंचालक, नगररचना पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक नरवि/कावि/रावेत/८/२४३/१९, दिनांक १२ डिसेंबर २०१९ अन्वये कळविले आहे. त्यानुसार या मूळ अधिसूचनेस व त्यास काढलेल्या शुद्धीपत्रकामध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, तालुका निरिक्षक, भूमि अभिलेख यांनी त्यांचे पत्र क्रमांक भूसंपादन/किवळे व रावेत/०६, दिनांक १४ डिसेंबर २००६ चे पत्रान्वये मौजे किवळे व रावेत गावांची एकत्रीकरणाची योजना झाली नसल्याने सदरचे गट क्रमांक हे सर्व्हे क्रमांक म्हणून वाचण्यात यावेत, असे कळविले आहे.

त्याअर्थी आता, मौजे किवळे, तालुका हवेली गावामधील दिनांक १६ नोव्हेंबर २००६ च्या शासन राजपत्रात प्रसिद्ध झालेले गट क्र. ७९ पै., गट क्र. ७८ पै., गट क्र. ७७ पै. व गट क्र. ७४ पै. यांना कोणताही क्षेत्रबदल न करता, सर्व्हे क्रमांक ७९ पै., सर्व्हे क्रमांक ७८ पै., सर्व्हे क्रमांक ७७ पै. व सर्व्हे क्रमांक ७४ पै. असे वाचण्यात यावेत व गट क्रमांक ७५ चे क्षेत्र संपादनातून वगळण्यात आले आहे.

तसेच, मौजे रावेत, तालुका हवेली गावामधील दिनांक १६ नोव्हेंबर २००६ च्या शासन राजपत्रात प्रसिद्ध झालेले गट क्र. ७२ पै., गट क्र. ७३ पै., गट क्र. ७४ पै., गट क्र. ९७ पै., गट क्र. ९८ पै., गट क्र. ९९ पै., गट क्र. १०० पै. व गट क्र. १५१ पै. यांना सर्व्हे क्रमांक ७२ पै., सर्व्हे क्रमांक ७३ पै., सर्व्हे क्रमांक ७४ पै., सर्व्हे क्रमांक ९७ पै., सर्व्हे क्रमांक ९८ पै., सर्व्हे क्रमांक ९९ पै., सर्व्हे क्रमांक १०० पै. व सर्व्हे क्रमांक १५१ पै. असे वाचण्यात यावे.

या व्यतिरिक्त, भूसंपादन क्षेत्रातील अधिसूचित क्षेत्रात खालीलप्रमाणे दुरुस्ती संपादन मंडळाच्या शिफारशीवरून करण्यात येत आहे.

**अनुसूची**

**मौजे किवळे, तालुका हवेली, जिल्हा पुणे**

| याऐवजी | | | | | | असे वाचावे | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दिनांक १६ नोव्हेंबर २००६ च्या मूळ अधिसूचनेनुसार संपादन करावयाचे क्षेत्र | | | दिनांक १५ डिसेंबर २०१४ च्या शुद्धीपत्रकानुसार संपादन करावयाचे क्षेत्र | | | सन २०२१ चे शुद्धीपत्रकान्वये दुरुस्त करावयाचे क्षेत्र | | | | |
| गट क्रमांक | संपादन करावयाच्या जागेचे अंदाजे क्षेत्र मौजे किवळे | | सर्व्हे क्रमांक | संपादन करावयाच्या जागेचे अंदाजे क्षेत्र मौजे किवळे | | सर्व्हे क्रमांक | संपादन करावयाच्या जागेचे अंदाजे क्षेत्र | | | |
| | हे. | आर | | हे. | आर | | हे. | आर | चौ. मी. | दिशा |
| १ | २ | | १ | २ | | १ | २ | ३ | ४ | ५ |
| ६६ पै. | ० | ४० | ६६ पै. | - | - | ६६ पै. | ० | ०२ | ३० | दक्षिणेकडील |
| ६७ पै. | ० | २० | ६७ पै. | - | - | ६७ पै. | ० | ०७ | ७५ | दक्षिणेकडील |
| | | - | ७३ पै. | ० | ०५ | ७३ पै. | ० | ०० | ५० | दक्षिणेकडील |
| ७६ पै. | ० | २३ | ७६ पै. | ० | ०१ | ७६ पै. | ० | ०० | ५० | दक्षिण- पश्चिमेकडील |

**अनुसूची**

**मौजे रावेत, तालुका हवेली, जिल्हा पुणे**

| याऐवजी | | | | | | असे वाचावे | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दिनांक १६ नोव्हेंबर २००६ च्या मूळ अधिसूचनेनुसार संपादन करावयाचे क्षेत्र | | | दिनांक १५ डिसेंबर २०१४ च्या शुद्धीपत्रकानुसार संपादन करावयाचे क्षेत्र | | | सन २०२१ चे शुद्धीपत्रकान्वये दुरुस्त करावयाचे क्षेत्र | | | | |
| गट क्रमांक | संपादन करावयाच्या जागेचे अंदाजे क्षेत्र मौजे रावेत | | सर्व्हे क्रमांक | संपादन करावयाच्या जागेचे अंदाजे क्षेत्र मौजे रावेत | | सर्व्हे क्रमांक | संपादन करावयाच्या जागेचे अंदाजे क्षेत्र | | | |
| | हे. | आर | | हे. | आर | | हे. | आर | चौ. मी. | दिशा |
| १ | २ | | १ | २ | | १ | २ | ३ | ४ | ५ |
| ७५ पै. | २ | १५ | ७५ पै. | २ | २७ | ७५ पै. | २ | २२ | ७० | उत्तर-पश्चिम व उत्तर-पूर्वेकडील. |
| १५३ पै. | ० | ५४ | १५३ पै. | ० | ६९.४५ | १५३ पै. | ० | ५४ | ०० | उत्तर-पूर्वेकडील |

**सौरभ राव,**
आयुक्त,
पुणे विभाग, पुणे.

पुणे, १९ जानेवारी २०२१.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411 006 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI – 400 004.

EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.